# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 194/2024 दिनांक : 01.06.2024

## 1)गंभीर दुखापत :–

**1)उस्माननगर :–**दिनांक 29.05.2024 रोजी चे 19.00 वा. चे सुमारास, **मौ. वाका ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने आरोपीस शेतात ट्रॅक्टरने दगडे का टाकलास असे विचारले असता आरोपीतांनी गैरकादयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे कॉलर धरून लाकडी काठीने, लोखंडी रॉडने, मांडीवर, पाठीवर व डोळयाचे उजव्या चाळयावर मारून गंभीर दुखापत केली. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शिवराज निळबा झुलवाड, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती व ट्रॅक्टर चालक ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 89/2024 कलम 143, 147, 148, 149, 326, 323, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पी के केंद्रे, मो. नं. 9325976675** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–**दिनांक 26.05.2024 रोजी चे 04.00 ते दिनांक 28.05.2024 चे 10.00 वा. चे दरम्यान, **रेल्वेस्टेशन नांदेड प्लॉट क्रमांक 4 च्या उत्तरेस गोकुळनगर चौरस्ता व शहापुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी हा पत्नीस चांगले वागवत नसल्याचे कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ व धक्का बुक्की करून रेल्वे स्टेशनचे बाहेर घेवुन आले व लाथाबुक्यानी मारून जबरदस्तीने बोलेरो गाडी क्रमांक टीएस–11/ईए–5481 मध्ये जबरदस्तीने हातपाय बांधुन गाडीत घातले व शहापुर ता. देगलुर येथे नेऊन पत्नीच्या मामाच्या घरात कोंडुन /डांबुन ठेवले व रोज तिन ते चार दिवस मी त्रास देतो म्हणुन लाठीने, लाथाबुक्यांनी जबर मारहाण केली असुन फिर्यादीचे डावे डोळयास मोठी दुखापत केली. परत पत्नीस त्रास दिल्यास जाळुन टाकण्याची धमकी दिली. फिर्यादीस डांबुन ठेवल्याचे त्याचे भावास समजल्याने त्यांनी आरोपीचे ताब्यातुन सोडवुन आणुन देगलुर येथे उपचार करून फिर्याद उशिराने दिली. वगैरे **फिर्यादी शेख मेहबुब पि. हमीद साहब, वय 35 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. अटकाळी ता. बिलोली जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 186/2024 कलम 143, 147, 148, 149, 363, 326, 323, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री तुरनर, मो. नं. 9922088409** हे करीत आहेत.

## 2)विवाहीतेचा छळ :–

**ईस्लापुर :–** दिनांक 01.07.2020 ते दिनांक 31.05.2024 रोजी चे 10.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी लक्ष्मीनगर, टाईनी शाळेजवळ नांदेड आणि मुंबई येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस दिड लाख रूपये हुंडा घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे ईस्लापुर** गुरनं 49/2024 कलम 498(अ),323, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/805 आकलेलु, मो.क्रं. 9552516246** हे करीत आहेत.

## 3)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**इतवारा :–**दिनांक 31.05.2024 रोजी चे 13.50 वा. चे सुमारास, **मालटेकडी ते देगलुरनाकाकडे जाणारे सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या आशोक लिलँड पिकअप वाहन क्रमांक एमएच–38/एक्स–3437 किंमती 3,00,000/–रू मध्ये दोन बैल किंमती 34,000/–रू चे स्वतःच्या आर्थीक फादयासाठी दाटीवाटी कोंबुन क्रुरपणे पायास बांधुन कतलीसाठी नेत असतांना एकुण 3,34,000/–रूपयाचे मुद्येमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/देविदास बापुराव बिसाडे, ने. पोस्टे इतवारा** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 189/2024 कलम 5, 5(अ), 9 सह कलम महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम 11(1)(ड),11(1)(ई), प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम प्राण्याचे परिवहन नियम 1960 सह कलम 83/177 मोटार वाहन अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहकॉ/1988 मानेकर, मो. नं. 9767002111** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 30.05.2024 रोजी चे 11.41 वा. चे सुमारास, **नविन मोंढा नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या कापसाच्या बियाण्याच्या दोन बॅगा किंमती 51,840/–रूपयाच्या मोटार सायकल वरून वाहुन विक्रीसाठी नेत असातंना मिळुन आला. तसेच कंपणीचे मालक व संचालक यांनी विना परवाना कापुस बियाणे विक्री करून फसवणुक केल्यामुळे सदर आरोपीतां विरूध्द सरकार तर्फे फिर्यादी देण्यात आली आहे. वगैरे **फिर्यादी सचिन विठठलराव कपाळे, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. शिराढोण ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं. 187/2024 कलम 420, 34 भादवि सह कलम 3, 5 बियाणे नियंत्रण आदेश, सह कलम 3, 7 ई सी ॲक्ट कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री तुरनर, मो.नं. 9922028409** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 31.05.2024 रोजी चे 14.50 वा. चे सुमारास, **महेबुबीया कॉलनी नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या रीज प्रमाणे व्हएच पटेल ॲण्ड कंपणी चाळीसगाव कंपणीच्या तोटयावरील लोगो असलेले बनावट प्रिंट तंबाखु किंमती 1,14,800/–रू चा माल तोटयाचे पुडे विक्री करून कंपणीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी बाबुलाल गंगाशरण अग्रवाल, वय 61 वर्षे, व्यवसाय व्हीएच पटेल तंबाखु डिलर रा. वजिराबाद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 430/2024 कलम 420, 468, 471, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कोरे, मो.नं. 8888836607** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**अर्धापुर :–** दिनांक 31.05.2024 रोजी चे 15.10 वा. चे सुमारास, **मालेगाव येथे चौकात वसमत जाणारे रोडवर फुलाचे लगत मोकळया जागेत ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 25,750/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मिलींद मधुकर सोनकांबळे, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 268/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2178 गोणारकर, मो.नं. 9689715358** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**हिमायतनगर :–** दिनांक 31.05.2024 रोजी चे 14.10 वा. चे सुमारास, **बाथरूममध्ये आरोपीचे घरी मौ. दरेसरसम ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 3500/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2204 बालाजी दादाराव पाटील, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 121/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2204 पाटील, मो.नं. 9765999899** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड